राज्यातील यंत्रमाग घटकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणेकरिता तीन महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्र. धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १३ मे, २०२६**

**वाचा :-**
१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१७/प्र.क्र.०६/टेक्स-५, दि.१५ फेब्रुवारी, २०१८.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५, दि.२१ डिसेंबर, २०१८.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५, दि.१३ सप्टेंबर, २०१९.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२ जून, २०२३.
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.१२ डिसेंबर, २०२४ व दि.०६ मार्च २०२४.
६) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५, दि.१५ मार्च, २०२४
७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५, दि.०२ सप्टेंबर, २०२४.
८) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१८/प्र.क्र.१६४९/टेक्स-५, दि.२७ ऑक्टोबर, २०२५.

**प्रस्तावना :-**

मा.मंत्रिमंडळाने दि.०७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार संदर्भ क्र.८ येथील शासन निर्णयान्वये, एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत वीज सवलतीचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील सर्व यंत्रमाग घटकांनी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन

नोंदणी करणे अनिवार्य करण्यात येत आहे. तसेच जे यंत्रमाग घटक सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणार नाहीत त्यांची वीज अनुदान सवलत आपोआप बंद करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर काही लोकप्रतिनिधी तसेच यंत्रमागाशी संबंधित विविध संघटनांनी वस्त्रोद्योग वीज दर सवलतीसाठी ऑनलाईन नोंदणीसाठीची मुदत वाढविण्याबाबत शासनास निवेदने सादर केली. सदर निवेदनात नमूद केल्यानुसार दि.२६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत मा.मंत्री (वस्त्रोद्योग) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणीचा सुटसुटीत अर्ज दि.०७.०४.२०२६ पासून उपलब्ध झाला आहे. त्यामुळे शासन निर्णय दि.२७ ऑक्टोबर, २०२५ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार दि.२६ एप्रिल २०२६ पर्यंत राज्यातील सर्व यंत्रमाग घटकांची ऑनलाईन नोंदणी करणे शक्य होणार नाही. त्यानुसार राज्यातील यंत्रमाग घटकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणेकरिता तीन महिन्याची मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः-</u>**

वरील प्रस्तावनेमध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील यंत्रमाग घटकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणेकरिता तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत वीज सवलतीचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील सर्व यंत्रमाग घटकांनी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीपर्यंत वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात येत आहे. तसेच जे यंत्रमाग घटक तीन महिन्याच्या कालावधीपर्यंत वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणार नाहीत त्यांची वीज अनुदान सवलत आपोआप बंद करण्यात येईल.

२.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१३१३२०४७५८०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.05.13 13:22:20 +05'30'

**( श्रीकृष्ण पवार)**
**(उप सचिव, महाराष्ट्र शासन)**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा. खासदार (सर्व), महाराष्ट्र राज्य.
९. मा. आमदार (सर्व), महाराष्ट्र राज्य.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्रालय मुंबई.
१२. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. महालेखापाल (लेखा व लेखा अनुज्ञेयता/लेखा परिक्षा महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई, नागपूर.
१५. व्यवस्थापक, टफ सेल मधिल सर्व बँका (ई-मेलद्वारे).
१६. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.
१७. निवड नस्ती (कार्यासन टेक्स-५).